महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११३ वा | दिनांक : २८/०१/२०२५ | वार : मंगळवार

## सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही



**रायगड :** रायगड जिल्ह्यातील पालकमंत्रिपदावरून सुरू झालेला वाद हा आणखी विकोपाला जाताना दिसत आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र साळवी यांनी खासदार सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही, असा इशाराच दिला आहे. तसेच आता तटकरे यांच्या विरोधात एकच मोहीम सुरू झाली आहे ती म्हणजे तटकरे हटाव मोहीम, अशा शब्दात महेंद्र साळवी यांनी हल्लाबोल केला आहे.

अलिबाग येथील कुसुंबळे येथे स्वर्गीय प्रमोद केशव ठाकूर प्रवेशद्वार नामकरण सोहळा पार पडला. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी सुनील तटकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. यात प्रामुख्याने आमदार महेंद्र साळवी यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे.

आमदार महेंद्र साळवी म्हणाले, एकनाथ शिंदेंसमोर आम्ही आमची कैफियत मांडली आहे. भरत गोगावले यांचे पालकमंत्रिपदाच्या रेस मधील नाव गायब होऊन आदिती तटकरे यांचे टाकण्यात आले. प्रोटोकॉलनुसार पालकमंत्रिपद हे भरत गोगावलेनाच मिळायला हवे होते. मात्र तटकरे यांनी गोगावले यांचे नाव यादीतून हटवण्यासाठी त्यांची जादू चालवली. यादीतून नाव गायब करणे हा तटकरे यांचा स्वभाव आहे. सुनील तटकरे यांना गोगावले हे मंत्री झाले तर पालकमंत्री निश्चित होणार हे माहीत झाल्यानेच त्यांनी पालकमंत्री पद त्यांच्याकडे खेचून आणले. मात्र आमच्या आक्रोशानंतर मुख्यमंत्र्यांनी यावर स्थगिती आणली. आम्ही आता आशावादी आहोत की येणाऱ्या चार दिवसात भरत गोगावले पालकमंत्री होतील.

पुढे बोलताना महेंद्र साळवी म्हणाले, भरत गोगावले यांचे नाव यादीतून वगळल्यानंतर रायगडमध्ये मोठा उठाव झाला. हा आमचा आणि लोकांचा उद्रेक आहे. गोगावले हे पालकमंत्री पदाचे दावेदार असतानासुद्धा तटकरेंनी आपल्या झोळीतच दान टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र आता कधीच असे होणार नाही. कारण सुनील तटकरे यांची झोळी फाटली आहे. आता जे काही दान पडेल ते भरत गोगावले यांच्या झोळीतच पडेल.

सुनील तटकरे यांच्यावर टीका करताना महेंद्र साळवी म्हणाले, सुनील तटकरे यांचा पूर्व इतिहास महाराष्ट्राला माहीत आहे. सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष पदाचा वापर करून दबाव तंत्र वापरले. त्यानी प्रोटोकॉलचे पालन केले नाही. तटकरे जरी पालकमंत्री पद खेचून आणण्यात यशस्वी झाले असले तरी ते येणाऱ्या काही दिवसात अयशस्वी ठरतील. आता कितीही काही झाले तरी येणाऱ्या काळात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत योग्य निर्णय घेतील.

आमदार महेंद्र साळवी म्हणाले, लोकसभा निवडणुकीच्या वेळी आम्ही सगळ्यांनी सुनील तटकरे यांच्यासाठी प्रामाणिकपणे काम केले होते. खरे तर सुनील तटकरे यांच्याबद्दल आमच्या मनात निगेटिव्हीटी होती. परंतु आम्ही त्यांच्यासाठी पॉझिटिव्ह होऊन त्यांना निवडून दिले. परंतु नेहमीप्रमाणे सुनील तटकरे यांनी त्यांची रणनीती तयार करून आम्हाला दगा दिला. सुनील तटकरे यांनी आतापर्यंत लोकांना फसवण्याचाच धंदा केला. आता तटकरे यांच्या विरोधात एकच मोहीम सुरू झालेली आहे ती म्हणजे तटकरे हटाव मोहीम. येणाऱ्या काळात सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही.

## ज्येष्ठ पत्रकार प्रकाशदादा चौधरी यांना जीवनगौरव




**अमरावती :** अमरावतीतील श्रमिक पत्रकार संघाने प्रजासत्ताक दिनी आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात 92 वर्षीय ज्येष्ठ पत्रकार प्रकाशदादा चौधरी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजापेठस्थित श्रमिक पत्रकार भवनात झालेल्या या कार्यक्रमात त्यांच्यासह इतर चार पत्रकारांनाही उत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्रातील नामवंत लेखक-पत्रकार शिरीष पै, आचार्य अत्रे, मा. गो. वैद्य यांच्यासारख्या दिग्गजांचा सहवास लाभलेले प्रकाशदादा चौधरी यांनी शिक्षक पदावरून पत्रकारितेकडे वळण्याचा निर्णय घेतला. त्यांनी गेल्या ५० वर्षांपासून सत्याधिष्ठित पत्रकारिता हाच खरा कर्मयोग मानून काम केले.

कार्यक्रमाध्यक्ष व पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कलंत्रे यांनी माध्यम क्षेत्रातील आव्हाने मांडताना विविध माध्यमांच्या युगातही वृत्तपत्रांची विश्वासार्हता अबाधित असल्याचे नमूद केले. संपादक ॲड. दिलीप एडतकर यांनी वृत्तपत्रांच्या बदलत्या स्वरूपाबद्दल चिंता व्यक्त करत सुधारणांची गरज प्रतिपादित केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे सचिव रवींद्र लाखोडे यांनी केले, तर कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर यांनी पुरस्कारार्थींचा परिचय करून दिला. शैलेश धुंदी यांनी सूत्रसंचालन केले, तर महेश कथलकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला पत्रकार संघाचे विविध पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीसांमध्ये छुपी रणनीती

**अमरावती :** युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. संजय राऊत यांना कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत, असा टोला रवी राणा यांनी लगावला आहे. उद्धव ठाकरे येत्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारतील, असा खळबळजनक दावाही रवी राणा यांनी केला.

विधानसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर ठाकरे गटाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. यावरुनच ठाकरे भाजपच्या जवळ येण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा केला जातोय. आदित्य ठाकरे यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांची तीन वेळा भेट घेतली होती. यावरुनच जोरदार चर्चा सुरु झाली. आता भाजच्या मित्रपक्षाने मोठा दावा केल्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. पण संजय राऊत यांना त्याची कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत, असे रवी राणा म्हणाले. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देखील नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारणार आहेत. त्या दृष्टीने त्यांचे पाऊल टाकणे सुरु असल्याचा दावा रवी राणा यांनी केला. उद्धव ठाकरे जेव्हा भाजपसोबत दिसतील, त्यावेळी संजय राऊतांना मोठा झटका बसेल, असेही ते म्हणाले.

रवी राणा यांच्या दाव्यावर संजय राऊत यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. रवी राणा यांची जे पी नड्डा यांच्या जागी नेमणूक केली आहे का? असा सवाल राऊत यांनी केला आहे. शिवसेना हा एक स्वतंत्र पक्ष आहे. शिवसेनेला एक परंपरा आहे. जेव्हा हा पक्ष स्थापन झाला तेव्हा ज्या व्यक्तीचे तुम्ही नाव घेतले त्यांचा जन्मही झाला नव्हता. असे संजय राऊत म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जानेवारी २०२५


# कन्नड : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उत्कृष्ट बिएलओं चा सत्कार



**कन्नड (अरुण थोरात):** राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालय निवडणूक विभागाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बि.एल.ओं चा दि. २५ जानेवारी रोजी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला आहे. कन्नड तालुक्यातील मतदान केंद्र स्तरावर नवमतदार नोंदणी, मतदार जनजागृती, पोलचीट वितरण, मतदारांना मार्गदर्शन आदींत उल्लेखनीय कामगीरी करणाऱ्या बि एल ओं चा तहसीलदार तथा तालुका निवडणूक अधिकारी कार्यालय कन्नड यांच्यातर्फे लोकसभा व विधानसभा निवडणूकीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बि एलओ भूषण पंडित (उपळा), बालाजी चोपणे (कळंकी), श्री पोतदार (वडाळी), श्री पवार,व श्री बागुल (संत ज्ञानेश्वर विद्यालय कन्नड) यांचा मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोषजी गोरड, तहसीलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसीलदार श्रावण उगले , श्री सोनवणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय निवडणूक विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्यातर्फे लोकसभा व विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट काम केल्याबद्दल सलीम आतार, मतदान नोंदणी अधिकारी(बी एल ओ) बहिरगाव तसेच चंद्रशेखर सौंदनकर (निवडणूक विभाग कन्नड) यांना मतदान नोंदणी अधिकारी संतोषजी गोरड, तहसीलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसीलदार श्रावण उगले, नायब तहसीलदार श्री सोनवणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साह साजरा करण्यात आला यामध्ये विद्यार्थ्यांनी कवायत डंबेल्स लेझीम तसेच देशभक्तीपर नृत्याचे सादरीकरण केले शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले व आभार प्रदर्शन मंगल तारो यांनी मानले तसेच शाळेतील शिक्षक सर्जेराव वाघ वसंत राठोड गणेश पठाडे संदीप चव्हाण जाहेद खान पठाण अर्चना भारद्वाज अनुजा भिंगोले सुनिता गनोरीकर विद्या सासवड नलिनी पाटील रवींद्र खापे सुनिता भोसले सुनिता साबळे यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची यशस्वी सांगता



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथील भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मल्लिकार्जुन वस्ती येथे सोमवारी (ता.२७ ) राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व शिबिरार्थींच्या उपस्थितीत समारोप संपन्न झाला.

या सांगता समारंभाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानी बळीराम नांगरे होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. मनीषा नगीले यांनी केले. कार्यक्रमाचे सविस्तर विवेचन करताना डॉ.नागिले म्हणाल्या की,"ज्ञान आणि श्रम यांची सांगड मानवी मनाला परिपक्व बनवीत असते.

श्रमसंस्कार हे मानवी मनाला संस्कारित बनवीत असतात.संस्कार संस्कृती निर्माण करीत असते आणि संस्कृती हीच देशाची खरी ओळख असते" यावेळी प्रमुख उपस्थित प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांनी बोलताना युवकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वावर भाष्य केले.

ते पुढे म्हणाले की,राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून युवकांचा सर्वांगीण विकास होऊन सामाजिक कार्य करण्याची त्यांच्यात आवड निर्माण होते.जीवनातील आव्हाने पेलण्याची प्रेरक शक्ती युवकांना शिबिरातून मिळाल्याने कुटुंबाच्या प्रगती बरोबरच राष्ट्हित साध्य होते. युवकांच्या जडणघडणीतच राष्ट्रहित सामावले आहे.यावेळी प्रा.भोरे यांचेही सामायोचीत भाषण झाले.

अध्यक्षीय समारोप बळीराम नांगरे यांनी आपल्या खास शैलीतून केला.यावेळी भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्वाती यादव, वरीष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.के.डी.चौरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. वामन भोरे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. मनिषा नागिले, प्रा.डी.आर.राठोड, प्रा.पी.आर.कांबळे, मा.विशाल पाटील, मा.विकास पाटील, राम दुधभाते, निलेश सूर्यवंशी, अंजिक्य काळे, सतीश कुंभार, आदींची उपस्थिती होती.

या सांगता समारंभाचे सूत्रसंचालन साक्षी मातोळे केले आणि प्रणिता बनसोडे यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जानेवारी २०२५

## डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात भारतीय सुजाण-सजग नागरिकत्व जागर व अभियानाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर (डॉ. प्रतिभा धोंडकर):** छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात रविवार दिनांक २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवक-युवतींना महाविद्यालयातील राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथींच्या वतीने सुजाण सजग नागरिकत्वाची दीक्षा, प्रतिज्ञा देण्यात आली. भारतीय सुजाण- सजग नागरिकत्व जागर अभियान महात्मा गांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने राबवण्यात येणाऱ्या या अभियानाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या सहकार्याने महाविद्यालयात करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी भारतीय नागरिकांच्या कर्तव्यांची आणि अधिकारांची जाणीव निर्माण करणे, तसेच देशाच्या विकासामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे आणि यासाठी असे उपक्रम कसे महत्त्वाची भूमिका पार पडतात याविषयी मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी उपस्थितांना सुजाण-सजग नागरिकत्वाची दीक्षा-प्रतिज्ञा दिली. तसेच उपस्थितांना भारतीय संविधान, त्याच्या तरतुदी, तसेच स्वातंत्र्य संग्राम आणि राष्ट्रीय एकतेचे महत्त्व समजावून सांगितले. ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय सहभाग घेणाऱ्या समाज सुधारक तसेच क्रांतिकारांवर आधारित पुस्तकांचे पुस्तक परीक्षण ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात कनिष्ठ महाविद्यालयातील अनुक्रमे प्रथम क्रमांक सार्थकी गुंड, द्वितीय क्रमांक श्रुती बुट्टे, तृतीय क्रमांक कनका देशपांडे तर वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम क्रमांक भाग्यश्री नंद, द्वितीय क्रमांक वैष्णवी ठोंबरे, तृतीय क्रमांक संजीवनी जाधव या विद्यार्थिनींना पारितोषिक वितरित करण्यात आले. तसेच स्वातंत्र्यसंग्रामावरील गीतगायन या स्पर्धेत कु. कल्याणी दीक्षित हिने प्रथम पारितोषिक पटकावले.

माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय तसेच डॉ.(सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये प्राध्यापक, विद्यार्थी यांनी अतिशय उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. प्रतिभा धोंडकर यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी संगीत विभाग प्रमुख डॉ. दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाने संगीत विभागाच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर समूह गीत सादर केले. डॉ. मीनाक्षी देव, डॉ. मनिषा वाघमारे तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार, डॉ. शोभा हनवते, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कन्नड तालुका औद्योगिक सहकारी संस्थेत संविधान गौरव दिन साजरा



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुका औद्योगिक बहुउद्देशीय ग्रामीण सहकारी संस्था मर्या च्या शहर कार्यालयात भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या शुभहस्ते दि. २६ जानेवारी रोजी ७६ व्या वर्धापन दिनाच्या निमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक रोहिदासदादा पाटील हे होते. जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी संस्थेबद्दल सविस्तर माहिती घेऊन चर्चा केली.

केंद्र व राज्य शासनाच्या प्रधानमंत्री विश्वकर्मा सन्मान योजना, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम(pmegp) तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती(cmegp) महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत मधमाशा पालन योजना (मधु केंद्र) ग्रामविकास चालना साठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्राम उद्योग मंडळाच्या बाराबलुतेदार ग्रामीण कारागीर स्वयंरोजगार व उद्योजक साठी प्रशिक्षण व अनुदानित कर्ज प्रकरण बाबत शासन दरबारी सर्वतोपरी मदत व पाठपुरावा आश्वासन दिले. संस्थेचे चेअरमन व भाजपा अनु.जाती मोर्च्याचे प्रदेश कोषाध्यक्ष राजेंद्र गव्हाणे यांनी ध्वजारोहण व राष्ट्रगीत झाल्यानंतर संविधान गौरव अभियान अंतर्गत संविधान उद्देशिकचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधान आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयजयकार करण्यात आला. प्रजासत्ताक दिन म्हणजे काय समजून घेणे गरजेचे आहे. २६ जानेवारी १९४९ रोजी भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून पूर्ण केले यालाच दोन वर्ष ११ महिने १८ दिवस इतका कालावधी लागला व २६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान अमलात आले.

याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, संस्थेचे चेअरमन श्री गव्हाणे, माजी सैनिक रोहिदास पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन शेख तुफेल अख्तर, संचालक सुधाकर मोरे, सुदाम पवार, कारभारी नागरे, शेख युनूस युसूफ, संस्थेच्या संचालिका व मा. नगरसेविका संगीता गव्हाणे, भाजपाचे अध्यक्ष सुनील पवार, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस प्रशांतजी अग्रवाल, भाजपा महिला आघाडी तालुकाध्यक्ष अर्चनाताई पवार, नारायण हिरे, निलेश पवार, मोहित पांडे, कामगार आघाडी चे तालुकाध्यक्ष अनिल शिरसाट, दिनेश राठोड मार्केट, कमिटीचे संचालक शेख युसुफ, श्री बाळूभाऊ, डॉ अजबराव गाडे आदी सभासद पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. भाजप तालुका सरचिटणीस कैलास जाधव यांच्या वाढदिवस साजरा करून कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेचे व्हाईस चेअरमन शेख तूफेल अखतर यांनी आभार मानले.

## प्रजासत्ताक दिन व अपूर्व विज्ञान मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न



**वेरूळ:-** येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) मध्ये संस्थेचे अध्यक्ष तथा आध्यात्मिक शिरोमणी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व प्रेरणेने,संस्कार संस्थेचे सचिव १०८ महंत स्वामी सेवागिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाने तथा आश्रमीय संत तथा कृषीभूषण असलेले ब्र. मा. लक्ष्मणगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भारताचा ७६ वा "प्रजासत्ताक दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी वेरुळ गावातून ढोल ताशा च्या गजरात व जयघोषात प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व ध्वजारोहक म्हणून वेरूळ गावचे सरपंच माननीय श्री प्रकाश पाटील मिसाळ हे होते तर ध्वज पूजक श्री मुलचंद चव्हाण साहेब (चेअरमन सेवा सहकारी सोसायटी), श्री महेंद्र दगडफोडे,वेरूळ हे होते.

यावेळी प्रमुखात येते म्हणून पोलीस पाटील श्री रमेश ढिवरे, ग्रामसेवक श्री चंद्रकांत इंगोले, व्यवस्थापक श्री शरदचंद्र पवार, श्री मुलचंद चव्हाण, श्री बाळासाहेब हिवर्डे (अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती),श्री किशोर काळे,श्री सागर मातकर, मस्सी सेठ, अभिषेक ठेंगडे पत्रकार हे होते. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बाबाजींच्या मूर्तीचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" अभियानांतर्गत जिल्हास्तरावर मिळालेल्या प्रमाणपत्र व स्मृती चिन्हाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शन करण्यात आले यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी संस्कृत, इंग्रजी, मराठी, हिंदी इत्यादी विषयात भाषणे केली. तसेच राष्ट्रभक्ती गीतावर सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी प्राध्यापक श्री गुळवे एन.एम.यांनी प्रजासत्ताक दिनाची माहिती सांगून भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये व महत्व सांगितले.

यावेळी मा. लक्ष्मणगिरीजी महाराज तसेच मा.श्री प्रकाश पाटील मिसाळ यांच्या हस्ते अपूर्व विज्ञान मेळावा तसेच रांगोळी प्रदर्शन चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विविध प्रयोगांची माहिती घेऊन तसेच रांगोळी पाहून आनंद व्यक्त केला व विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचे कौतुक केले यावेळी गुरुकुलातील सर्व उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनींनी विविध विज्ञान प्रयोगांची माहिती घेतली.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री बोरसे व्ही.यु., प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापिका श्रीमती ताले ताई, ज्येष्ठ शिक्षक तथा पर्यवेक्षक श्री अधाने गुरुजी यांच्यासह प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना श्री संतोष ठेंगडे यांच्या तर्फे केळीचे वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री देव गुरुजी तर आभार प्रदर्शन श्री अधाने गुरुजी यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जानेवारी २०२५


## राजर्षी शाहू महाविद्यालयाला करियर कट्टा अभियानाअंतर्गत महाविद्यालयीन प्रोत्साहन स्पर्धेचे जिल्हास्तरीय तीन पुरस्कार



**पाथ्री :** राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथ्री ता.फुलंब्री येथे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री द्वारकाभाऊ पाथ्रीकर, सचिव माननीय प्राचार्य सौ उषाताई पाथ्रीकर व संस्थेचे सहसचिव माननीय श्री वरूनभैय्या पाथ्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर कट्टा या विभागाची स्थापना करण्यात आली.

महाविद्यालयातील करिअर कट्टा या विभागात दरवर्षी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात २०२४-२५ मध्ये करियर कट्टा विद्यार्थी जनजागृती अभियान, करिअर कट्टा फलक उद्घाटन, करियर संवाद महामेळावा, आर्थिक साक्षरता कार्यशाळा, पोलीस भरती प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, डॉक्युमेंटरी मेकिंग स्पर्धा अशा वेगवेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आयोजित करिअर कट्ट्या प्रोत्साहन स्पर्धेत २०२४- २५ मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील मिरगणे व सर्व करिअर कट्ट्याच्या टीमने पारितोषिक स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय म्हणून द्वितीय पुरस्कार महाविद्यालयास मिळाला. तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील मिरगणे यांना तृतीय पुरस्कार मिळाला व उत्कृष्ट तालुका समन्वयक म्हणून डॉक्टर राजू पोपळघट यांना द्वितीय पुरस्कार मिळाला. पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय द्वारकाभाऊ पाथ्रीकर, संस्थेचे उपाध्यक्ष माननीय श्री राजूभाऊ पाथ्रीकर, संस्थेच्या सचिव प्राचार्य सौ उषाताई पाथ्रीकर व संस्थेचे सहसचिव माननीय श्री वरूनभैय्या पाथ्रीकर यांनी प्राचार्य तालुका समन्वयक डॉ राजू पोपळघट करिअर कट्ट्याचे समितीचे अध्यक्ष डॉ. रवी जाधव, डॉ. आरती थाले डॉ. दिनेश अहिरराव प्रा. ऋषिकेश लहाने यांचे अभिनंदन केलेतसेच महाविद्यालयाला पुरस्कार मिळाल्याबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य उपप्राचार्य व सर्व स्टाफ यांनी करिअर कट्टा विभागाचे अभिनंदन केले.

यासाठी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. शशिकांत बंडेवार, केमिस्ट्री विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रश्मी पाथ्रीकर, भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सचिन मोरे संस्थेच्या संचालिका कल्याणी पाथ्रीकर डॉ. दिपक गायकवाड डॉ. कैलास इंगळे डॉ रेखा मेश्राम डॉ दत्तात्रय फुके डॉ शेळके भाऊसाहेब डॉ.प्रवीण बेराड डॉ किशोर वाघ प्रा. किरण धनेधर डॉ केशव लहाने डॉ.तनिषा दळे डॉ गहेराव युवराज डॉ.प्रमोद पाथ्रीकर डॉ प्रवीण ठाकरे प्रा. ज्ञानेश्वर पाथ्रीकर डॉ श्यामसुंदर कंटुले डॉ शिवाजी उबरहंडे डॉ दीपक गायकवाड डॉ शेलार प्रा पवन काळे प्रा अजय राठोड डॉ सुरेश आलोने डॉ तुकाराम कांबळे सुनील अन्नदाते ललित अन्नदाते सुनील पंडित रोहन साबळे योगेश डकले व दिपक पैठणी यांचे सहकार्य लाभले.

## त्या शाळेचा परवाना रद्द करा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची मागणी




**छत्रपती संभाजी नगर :** २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त वाळूज परिसरातील स्मॉल वंडर स्कूल बोहरा नगर वाळूज येथील संस्थाचालक एडवोकेट योगेश बोहरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तथागत गौतम बुद्धांच्या बाबत वादग्रस्त विधान केले असून हे विधान म्हणजे दोन समाजात तेढ निर्माण करणारे असून तथागत गौतम बुद्धांच्या बाबतीत अवमान कारक आहेत ही माहिती ज्या वेळेस जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांना मिळाल्यानंतर लगेच त्यांनी वाळूज पोलीस स्टेशन गाठून घटनेची माहिती संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना देऊन कारवाईची मागणी केली.

पण काल २६ जानेवारी गणतंत्र दिन असल्याकारणाने काही पोलिस अधिकारी कर्मचारी सुट्टीवर होते व विषय सामाजिक असल्याकारणाने व वक्तव्य हे तथागत गौतम बुद्धाच्या विरोधात असल्याकारणाने पोलीस प्रशासनाने जिल्हाध्यक्ष यांच्याशी चर्चा करून एक दिवस थांबून आम्ही या घटनेची चौकशी करतो आपण उद्या गुन्हा नोंदवा असे सांगितले.

त्यानंतर दिनांक २७ जानेवारी रोजी जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे हे वाळूज पोलीस स्टेशन येथे सर्व पुराव्यासहित हजर होऊन गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली. पोलीस निरीक्षक यांच्याशी चर्चा होऊन आज संबंधित संस्थाचालक बोहरा यांच्यावर दोन समाजात तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्या कारणाने कलम २९९ बी एन एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून लवकरच या प्रकरणी आम्ही कारवाई करणार असल्याचेही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

जर येत्या आठ दिवसात या संस्था चालकावर कारवाई होऊन त्यास योग्य ती शिक्षा न दिल्यास आठ दिवसानंतर शाळेसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांनी पत्रकार यांच्या शी बोलताना सांगितले आहे. जिल्हाध्यक्ष- राहुल वडमारे जिल्हा सचिव -बापूसाहेब चाबुकस्वार जिल्हा उपाध्यक्ष - संजय चव्हाण वाळुज महानगराध्यक्ष -महादेव मस्के विद्यार्थी नेते बाळू गायकवाड डॉ.संदीप राणे, एकनाथ तीरमिले, विकास तायडे, मनोज पगारे, अंबादास वाघ.

## प्रा.डॉ. किशोर काळे यांना महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक



**करमाड :** राजीव गांधी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय करमाड येथील प्रा.डाॅ.किशोर काळे यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन स्पर्धेत एकुण दोन पारितोषिके प्राप्त झाली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महाविद्यालयीन स्पर्धेत उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक म्हणुन प्रथम म्हणून प्रा. किशोर काळे क्रमांक मिळाला. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेत देखील उत्कृष्ट राज्यस्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणुन तृतीय क्रमांक अशी दोन पारितोषिकेही प्रा. काळे मिळालेली आहेत.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रभर विविध महाविद्यालयात करियर कट्टा हा उपक्रम राबविला जातो.

त्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या सचिव श्रीमती शैलजा जोशी, रोहिनी जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे,डॉ. बाळासाहेब लिहिणार डॉ. नरेश डहाळे, डॉ. कालिदास फड प्रा.मनोज देवकर,डॉ चिंचोलीकर, डॉ. दांडगे प्रा.डॉ.जयश्री पाटील, प्रा.गणेश कुऱ्हाडे, प्रा. ज्ञानेश्वर लांडगे, प्रा. अर्जुन चव्हाण, ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जानेवारी २०२५


# डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात गुणवंत गौरव व वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (डॉ. प्रतिभा धोंडकर):** :- येथील डॉ. सौ.इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे गुणवंत गौरव व वार्षिक स्नेहसंमेलनाचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवार दि.18/01/2025 रोजी तापडिया नाट्य मंदिर येथे संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. अॅड. डॉ कल्पलता पाटील भारस्वाडकर (अध्यक्ष, मराठवाडा लिगल अॅण्ड जनरल एज्युकेशन सोसायटी, छत्रपती संभाजीनगर)या होत्या,विशेष अतिथी म्हणून मा.श्री.पार्थ घाडगे (सुप्रसिध्द सिने - नाटय - दूरदर्शन अभिनेते) हे उपस्थित होते.

या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्या प्रा.डॉ. सुनिता बाजपाई, स्नेह संमेलन समिती प्रमुख प्रा. डॉ.पराग चौधरी,विद्यार्थी संसद समिती प्रमुख प्रा. डॉ. मीनाक्षी देव -निमकर ,पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार ,प्रा शोभा हनवते यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली, व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. या नंतर स्नेह संमेलन प्रमुख डॉ.पराग चौधरी यांनी स्नेह संमेलनाचा अहवाल सादर केला. प्रा. पूजा दीक्षित यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. श्री. पार्थ घाडगे यांचा परिचय करुन दिला.

प्रमुख अतिथी मा. श्री.पार्थ घाडगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजात मुलींचे स्थान व शिक्षणातून त्यांना स्वतःचे एक वेगळे अस्तित्व निर्माण करता येते.आर्थिक साक्षरता मुलींना वैचारिक स्वतंत्रता ही देते. कला शाखेतील विद्यार्थ्यांना सिनेमा , नाट्य क्षेत्रात निर्माण झालेल्या नवीन संधी बद्दल माहिती दिली.

कला शाखेला आणि साहित्याला कृत्रिम बुद्धिमत्ता AI कधीच बाधित करू शकत नाही असे सांगून त्यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या . नाट्य कार्यशाळा साठी पहिल्यांदा तापडिया नाट्य मंदिर येथे येण्याचा योग आला होता ,आज परत प्रमुख पाहुणे म्हणून येताना खूप आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले स्वतःच्या आनंदा साठी जगा, असा संदेश त्यांनी मुलींना या वेळी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. अॅड. कल्पलता पाटील भारस्वाडकर यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.स्पर्धेत सहभागी झाल्याने आत्मविश्वास वाढीला लागतो .सांस्कृतिक कार्यक्रमातून आपल्याला आपली जगण्याची नवीन वाट सापडू शकते.मुलींचे स्थान बदलत आहे.त्यांनी जिद्दी ने उंच भरारी घ्यावी.

कोणत्याही क्षेत्रात परिश्रमाला पर्याय नाही.असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात १२ वी बोर्ड परीक्षेत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थिनींचा प्रतिष्ठित मान्यवरांच्या वतीने ठेवण्यात आलेल्या रोख रक्कमेचे पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला, त्यात विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम आलेली कु.अबोली गावपांडे, वाणिज्य शाखेतून सर्वप्रथम आलेली कु.साक्षी जाधव, तसेच मराठी विषयात महाविद्यालयातून सर्वप्रथम आलेली कु.विशाखा मोकळे, १२ वी बोर्ड परीक्षेत संस्कृत विषयात कु.खुशाली मधेकर, गृहशास्त्र विषयात कु.तृप्ती ठाकूर वाणिज्य शाखेत अभिराम जोशी व पूजा काकडे,एच एस व्ही सी शाखेत कु.मृणाल भोसले विज्ञान शाखेत कु.साक्षी कुळकर्णी यांना रोख पारितोषिक प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे माजी अध्यक्ष अॅड जे. के. वासडीकर यांच्या वतीने महाविद्यालयात शिकत असलेल्या गरजू , हुशार व होतकरू विद्यार्थिनीला आर्थिक मदत दिली जाते.

या वर्षी बी ए द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु.खुशी गवळे हिला या मुदतीचा लाभ मिळाला. यावेळी स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थिनींचाही मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

त्यात उत्कृष्ट विद्यार्थिनी कला विभाग कु. भाग्यश्री नंद (बी.ए तृतीय वर्ष) वाणिज्य विभाग कु.मीनाक्षी नाईक (बी कॉम तृतीय वर्ष) व्यवस्थापन शास्त्र कु. वैशाली चव्हाण( बीसीए तृतीय वर्ष) तसेच अष्टपैलू विद्यार्थिनी भाग्यश्री नंद,उत्कृष्ट खेळाडू निकिता खरात व युवराज भाकडे( इयत्ता १२ वी) कु.आरती ठाकूर (बी कॉम तृ.व.)बेस्ट एन. एस.एस. वैष्णवी ठोंबरे( बी ए तृतीय वर्ष)उत्कृष्ट वाचक कु. आचल साळवे ( बीए प्रथम वर्ष) विविध अंतर महाविद्यालयीन तसेच राज्य व देश पातळीवर झालेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील यश मिळविलेल्या विद्यार्थिनींचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

स्नेहसंमेलन जानेवारी २०२५ निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थिनींना स्मृतिचिन्हे व प्रशस्ती पत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धांपैकी मिस आय. बी. पी. या महत्त्वाच्या स्पर्धेमध्ये कु भाग्यश्री नंद व कु. साफल्या धानोरकर या विद्यार्थिनींना कॉलेज आयडॉल म्हणून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुषमा देशपांडे यांनी केले.स्नेहसंमेलन स्पर्धा चे पारितोषिक वाचन प्रा. डॉ.प्रभाकर गायकवाड यांनी तसेच क्रीडा पुस्कारांचे वाचन प्रा डॉ दिलीप दोडके यांनी केले. आणि गुणवंत गौरवचे पुरस्कार वाचन प्रा. कु. अश्विनी शहाणे यांनी केले.

गुणवंत गौरव व वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमाचे आभार प्रकटन विद्यार्थी संसद समिती प्रमुख प्रा. डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांनी केले.कु. कल्याणी दीक्षित यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास शहरातील प्रतिष्ठित मान्यवर,विद्यार्थिनी,पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गझल हा मृत्यूला बोलका करणारा काव्यप्रकार... डॉ. वासुदेव उगले




**जालना :** गजल या प्रकारचा जन्म हा मानवाच्या वेदनेतून झालेला आहे. मानवी जीवनाच्या मूळ अधिबंधाची मृत्यूची भीती आणि वेदना आहे. गझल हा वेदनेचा कारुण्यपूर्ण अविष्कार असल्याने गझल हा मृत्यूला बोलका करणारा काव्यप्रकार आहे असे प्रतिपादन गझल लेखन तंत्र कार्यशाळेच्या प्रथम सत्रात आयक्यूएसी समन्वयक व नवोदित मराठी गझलकार डॉ. वासुदेव उगले यांनी केले.

येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि आयक्यूएसीच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमीत्त विविध कार्यशाळा व्याख्याने संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून मराठी भाषा संवर्धनासाठी गझल लेखन तंत्र कार्यशाळा व विद्यार्थी – प्राध्यापकांच्या द्वैभाषिक गझल मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. तळेकर होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयक्यूएसी समन्वयक व नवोदित मराठी गझलकार डॉ. वासुदेव उगले हे होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. विद्या पटवारी यांची विशेष उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. उगले म्हणाले की, गझल हा काव्यप्रकार आज जगभरातील सर्वच भाषेत प्रचलित होत आहे. गझल हा काव्यप्रकार अलीकडे तरुणांमध्ये अतिशय लोकप्रिय होत आहे. गजलेचा स्थायीभाव हा वेदनेचा अहंकार व अभिव्यक्ती हा असल्यामुळे गझल प्रेक्षक स्रोत्यांच्या थेट काळजाला भिडते. गझल या शब्दाची उत्पत्ती पारशी आणि उर्दू भाषेत असल्याने तिचा अर्थ हरणीची वेदना आणि विरह त्यातून अभिव्यक्त होतो. जगभरातील सर्वच भाषेतील कवितेमध्ये हरणीची प्रतिमा वेदना आणि सौंदर्य अशा अर्थाने घेतली जाते.

गजल लेखनाच्या तंत्रामध्ये गझल हा वृत्त आकृतीबंधातून अविष्कृत होणारा काव्य प्रकार आहे. गजल लेखन करत असताना लघु गुरु यांच्यासह यमक साधावा गजलेचा शेर आणि मातला यांचाही मेळ गजल लेखकाला लक्षात घ्यावा लागतो. गझल लेखनाचे तंत्र म्हणून व्याकरनिक वृत्तलेखनाचे बंधन महत्त्वाचे असते. या वृत्तीय आकृतीबंध शिवाय गजलेतील शब्दांना अर्थपूर्णता प्राप्त होत नाही असेही ते म्हणाले. विविध उदाहरणांच्या साहाय्याने प्रत्यक्ष फलकावर वृत्तामध्ये गझल कशी निर्माण होते व कशी बसते याची प्रात्यक्षिके विद्यार्थिनींना दाखविली.

गझल हा काव्यप्रकार केवळ शहरांमध्ये न राहता हल्ली ग्रामीण परिपोशामध्ये सुद्धा सकस पद्धतीने निर्माण होत आहे. समकालात प्रचलित असलेल्या साहित्य प्रवाहाबरोबरच गजलेतही आशय विषयाचे विविध प्रवाह आज निर्माण होताना दिसत आहे. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी अशा विविध नाविन्यपूर्ण विषयाला व वेदनेला घेऊन गझल येते आहे. आजच्या पिढीने गझल हा प्रकार सर्वसामान्यांच्या जीवनातील वेदनेचा अविष्कार बनवावा असे आवाहन त्यांनी गजल लेखन तंत्र या विषयावरील कार्यशाळेच्या प्रथम सत्रात केले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात विद्यार्थी-प्राध्यापकांच्या द्विभाषिक गझल मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कु. प्रथा देवावाले, कु. साक्षी गोंडे, कु. अनुष्का गाडेकर, कु. प्रियंका उफाड या विद्यार्थिनींनी गझल मुशायऱ्यात सहभाग घेतला. तर समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विद्या पटवारी, इतिहास विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुधाकर वाघ, वाणिज्य विभागाचे प्राध्यापक डॉ. जितेंद्र अहिरराव, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे ग्रंथपाल प्रा. राहुल अंभोरे, हिंदी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. जयश्री वाडेकर, हिंदी विभागाच्या प्राध्यापिका सीमा गुप्ता, अर्थशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका दीक्षा आनंद, इंग्रजी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.पूजा अरोरा, राज्यशास्त्र विभागाचे प्रा.राहुल हिवाळे, वाणिज्य विभागाच्या प्राध्यापिका अंजू कुलकर्णी, इतिहास विभागाच्या प्राध्यापिका साईलीला पारीक इत्यादींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. तळेकर म्हणाले की, हिंदी सिनेमा सृष्टीमुळे गझल कव्वाली असे विदेशी काव्यप्रकार भारतामध्ये लोकप्रिय झालेले आहेत मात्र अलीकडच्या काळात मराठी भाषेतून येणारी गझलही अतिशय लोकप्रिय होत आहे ही खरोखर भाषा संवर्धनाच्या दृष्टीने गर्वाची बाब आहे. वेगवेगळ्या लेखन प्रकारातून समृद्ध साहित्य निर्माण झाल्यास भाषा संवर्धन आपोआप घडेल. यासाठी नवोदित लेखकांनी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन लिहिते होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार हिंदी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. जयश्री वाडेकर यांनी खास काव्यमय क्षमा सुधार शैलीत प्रकट केले. या कार्यक्रमाचे युट्युब लाईव्ह सुद्धा उपलब्ध करून देण्यात आले होते यासाठी तंत्रज्ञ म्हणून ग्रंथपाल राहुल अंभोरे यांनी यशस्वी कार्य केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इतिहास विभागप्रमुख डॉ.सुधाकर वाघ, श्री.एकनाथ फुपाटे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनीची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जानेवारी २०२५


## एसटी भाडेवाढ विरोधात कन्नड येथे उबाठा चे चक्का जाम आंदोलन




**कन्नड (अरुण थोरात):** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मध्यवर्ती बस स्थानक कन्नड येथे एस टी भाडेवाढी विरोधात दि. २७ जानेवारी रोजी चक्का जाम आंदोलन करण्यात आले.

उपस्थित उबाठा शिवसैनिकांनी सरकार विरोधात घोषणा देत सरकार चा निषेध केला. महागाई बेरोजगारी, शेतीमालाला मिळणारा कवडीमोल भाव यामुळे सर्वसामान्य होरपळून निघत असताना त्यांना दिलासा देण्या ऐवजी आता एसटी भाड्यात ही वाढ करुण, सरकार जखमेवर मीठ चोळत आहे.

त्यामुळे सरकार ने भाडेवाढी चा घेतलेला निर्णय रद्द झालीच पाहिजे. महागाई कमी झालीच पाहिजे आदी भावना व्यक्त करत उबाठा शिवसेना तालुका प्रमुख संजय मोटे यांनी सरकार विरोधात भाषण केले.

या आंदोलनात तालुका संघटक डॉ. अण्णासाहेब शिंदे, युवा तालुका अधिकारी योगेश पवार, शेतकरी तालुका संघटक गणेश शिंदे, उप तालुका प्रमुख गीताराम दादा पवार, नवनाथ राठोड, योगेश गवळी, बाबासाहेब मोहिते, विभागप्रमुख कल्याण चव्हाण, उपविभाग प्रमुख अर्जुन पवार, शाखा प्रमुख गणेश भिंगारे, सदाशिव क्षीरसागर, सुभान शेख, श्री बोरसे आदी सहभागी झाले होते.

## कर्मवीर आ.मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात ब्रिगेडियर हितेंद्रजी मराठे यांच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहण



**पिंपळनेर :** प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने देशाच्या एकतेसाठी सर्वांनी समतेच्या भावनेने वागून देशहित व समाज हित साधने गरजेचे आहे. त्याचबरोबर मी देशाची सेवा करतो याचा मला अभिमान आहे. त्यामुळे आजचा हा ध्वजारोहणाचा सन्मान मला मिळाला आहे. असाच सन्मान प्रत्येकाच्या जीवनात निर्माण झाला पाहिजे. असे मत सिकंदराबाद येथील ब्रिगेडियर हितेंद्र जी मराठे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज कमिटी चेअरमन धनराज जैन होते. विचार मंचावर भिकन कृष्ण पाटील उर्फ घाणेकर गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी. पवार, ॲड. नरेंद्र मराठे व सेवानिवृत्त होणारे प्रा.व्ही.जी. उगलमुगले,प्रा. डॉ.सतीश मस्के आदी उपस्थित होते.

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात 73 वा प्रजासत्ताक ध्वजारोहण कार्यक्रम ब्रिगेडियर हितेंद्र मराठे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एल. बी.पवार यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व ओळखून प्रत्येकाने आपल्या जीवनात आचरण करून वागणे गरजेचे आहे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात विविध स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानाची व कर्तव्याची निश्चित जाणीव होईल. यावेळी घाणेकर गुरुजी म्हणाले की, अच्छा प्रत्येक विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे पालन करून, समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचे स्मरण करून त्याचबरोबर स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या सैनिकांनाही स्मरूण आपण कार्य केले पाहिजे. सध्याची देशातली परिस्थिती तरुणांना बेरोजगारीकडे घेऊन जाणारी आहे.

याचेही भान राखून विद्यार्थ्यांनी जीवनाची वाटचाल करायला हवी. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन म्हणाले की, आपल्या देशाचा कारभार हा संविधानानुसारच चालतो. तीच भूमिका विद्यार्थ्यांनी घेऊन भावी जीवन घडवायला हवे. शिक्षणाच्या व ज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थी सक्षम व्हायला हवा. यावेळी वाचन संकल्प महाराष्ट्राचा निमित्ताने ग्रंथालयात बसणाऱ्या यशराज शेवाळे व करिष्मा गांगुर्डे यांचाही सत्कार करण्यात आला.

ध्वजारोहणानंतर प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. एन.सी.सी.चे प्रा.डी.बी.जाधव यांनी राष्ट्रीय छात्र सेनाच्या विद्यार्थ्यांनी ध्वजारोहणास सलामी दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रास्ताविक व आभार प्रा.डा.सतीश मस्के यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## औषध निर्मितीतील नाविन्यपूर्ण मॉडेलचे अनावरण शरण पाटील यांच्या हस्ते......



**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीकडून प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून औषध निर्मितीतील नाविन्यपूर्ण मॉडेलचे अनावरण फित कापून उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते रविवारी (ता. २६) रोजी करण्यात आले. प्रारंभी दिवंगत माधवराव (काका) पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना अभिवादन करण्यात आले.

माधवराव पाटील महाविद्यालयात शरण पाटील यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, राजू भोसगे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक मिनियार, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, फार्मसीचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. सुभाष हुलपल्ले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

औषध निर्मितीतील मॉडेल सादरीकरणात नबीलाल जमादार (फार्मसी औद्योगिक मॉडेल), आकांक्षा इंगळे (रक्तशुद्धीकरण), सुरज साठे (वेदना मार्ग), प्रियंका दुर्गा (मानसोपचार), पूजा अंबर (जीपीसीआर), रोहिणी पुजारी (हृदय आणि रक्तवाहिन्यांचे कार्य), अंजली पवार (पचन संस्था), हर्षदा सूर्यवंशी (औषधांच्या पॅकिंग इंडस्ट्री), सानिका इंगळे (स्नायू आकुंचन), ओमकार मुद्कण्णा व पुष्कराज शिंदे (पेशिका विभाजन), शुभांगी गायकवाड, आश्विनी व निशिगंधा (ड्रग इंटरअॅक्शन), ओमकार राजमाने व सुप्रिया (फुफुसांचे कार्य), विश्वराज पिसे (हॅमर मिल), अभिषेक चौघुले (रेशम निर्मिती), अंजली बेळंबे व अर्पिता धुमाळ (रक्तप्रवाह), रूपाली जमादार (किडनीचे कार्य), कांचन खरात (प्राणी पेशी), आरती दूधभाते व प्रज्ञा कीर्तने (मेडिकल स्टोर), सानिका पोतदार (ग्लोबल वार्मिंग), नवनाथ खंडाळकर (मानवनिर्मिती मॉडेल), दानिश सय्यद (वनस्पती पेशी), नौमन शिकलगार (ट्रान्सपोर्ट सिस्टीम अक्रस सेल), तेजस हलमडगे (सूक्ष्मदर्शिका), महादेव जाधव (मानवी शरीर रचना) आदी स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला.

प्रा. सुदीप ढंगे, प्रा. राहुल इंजे, प्रा. पायल आगरकर, प्रा. विनंती बसवंतबागडे, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. रजनंदिनी लिमये, प्रा. सदफअलमास मुजावर, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. अनिल मोरे, प्रा. विवेकानंद चोधरी, प्रा. लखन पवार यांचे मार्गदर्शन लाभले. अमोल कटके, किशोर कारभारी, पल्लवी कमलापुरे, चंद्रकांत पुजारी आदींनी पुढाकार घेतला. यावेळी माधवराव पाटील महाविद्यालय व फार्मसी कॉलेजचे प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जानेवारी २०२५

## प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण शरण पाटील यांच्या हस्ते... नेत्रदीपक कवायती सादर करून दिली मानवंदना..



**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील प्रतिभा निकेतन विद्यालयाच्या भव्य मैदानावर प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, नूतन प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रविवारी (ता. २६) रोजी उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सौ. संपदा पाटील, श्वेता पाटील, स्मिता पाटील, संगीता पाटील, विठ्ठलसाई साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसाने, कोथळीचे नंदकिशोर लोहिया, संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, संचालक राजू भोसगे, प्रा. डॉ. सतिश शेळके, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, सच्चिदानंद अंबर, सचिन पाटील, योगेश राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयाच्या प्रांगणात प्रारंभी शरण पाटील यांना सजवलेल्या आकर्षक गाडीतून व पुढे दोन बुलेटस्वरांची शिस्तबद्धपणे संपूर्ण पथकांचे निरीक्षण केले. अनुशासनबद्ध हालचाली, गणवेशातील सुसंवाद, नेत्रदीपक कवायती करत आठ पथकांनी पथसंचलन करीत राष्ट्रध्वजास व मान्यवरांना मानवंदना दिली.

लक्ष्मी हडपे (इयत्ता सहावी) व शिवकन्या भालकाटे (इयत्ता नववी) या सैनिकांच्या गणवेशात हिंदीतून भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता सहावी (ब) च्या विद्यार्थिनींनी मराठी गीतावर लेझीम, नूतन शाळेच्या पहिलीच्या वर्गातील विद्यार्थिनींनी हिंदी गीतावर नृत्य, इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थिनींनी एकली एकली चालू रे... या बंजारा गीतावर नृत्य, नूतन शाळेच्या चौथीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी गीतावर नृत्य, इयत्ता सातवी (ब) च्या विद्यार्थ्यांनी माऊली माऊली... या मराठी गीतावर टाळ मृदंगाच्या निनादात महाराष्ट्राची वारकरी संप्रदायाचे परंपरा सादर, इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थिनींनी बंजारा गीत, या कार्यक्रमाची सांगता सामूहिक घोषणा व देशभक्तीपर इयत्ता नववी (ब) च्या विद्यार्थिनींनी जय जवान जय किसान.... या गाण्यांनी झाली. उपमुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, राजशेखर कोरे, परिवेक्षक विवेकानंद परसाळगे, राधाकृष्ण कोंढारे, क्रीडा शिक्षक सुजित शेळके, सांस्कृतिक कार्यक्रमाचे शिवशंकर तांबडे, रविकांत स्वामी आदींनी पुढाकार घेतला. पालक व गावकऱ्यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इरफान मुजावर तर आभार करबसप्पा ब्याळे यांनी मानले.

## चेतना शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला वरिष्ठ महाविद्यालयात भूगोल दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : येथील चेतना वरिष्ठ कला महाविद्यालयात भूगोल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या उषा बनसोडे या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. विजय बैसाने यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. भालचंद्र ठावरे यांनी केले. डॉ. बैसाने यांनी भूगोल दिन का साजरा केला जातो यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ उषा बनसोडे अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ अमित लोखंडे यांनी केले तर आभार प्रा जंजाळ यांनी मानले.

## परीक्षा कॉपीमुक्त व तणावमुक्त व्हाव्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर, (जिमाका)** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे येत्या फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षा होणार आहेत. जिल्ह्यात इयत्ता १२ वी ची परीक्षा ६३ हजार ९७८ विद्यार्थी तर इयत्ता १० वी ची परीक्षा ६८ हजार २२३ विद्यार्थी देत आहेत. त्यासाठी एकूण ३९९ परीक्षा केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली आहे. इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा ह्या कॉपीमुक्त आणि तणावमुक्त व्हाव्यात. तसेच त्यासाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक आहे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये इयत्ता १० वी आणि १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षा होणार आहेत. इयत्ता १० वीची परीक्षा दि.२१ फेब्रुवारी ते १७ मार्च या दरम्यान असून इयत्ता १२ वी ची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान होणार आहेत. इयत्ता १२ वी साठी जिल्ह्यात १६१ केंद्र असून ६३ हजार ९७८ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. त्यासाठी २२ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर इयत्ता १० वी ची परीक्ष २३८ केंद्रांवर होणार असून ६८ हजार २२३ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

या परीक्षेसाठीही २२ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुकानिहाय परीक्षा केंद्र व विद्यार्थी संख्या या प्रमाणे- इयत्ता १० वी- छत्रपती संभाजीनगर ग्रामिण- १७ केंद्र ५९२२ विद्यार्थी, छत्रपतीसंभाजीनगर शहर-७५ केंद्र २१ हजार ७५८ विद्यार्थी, गंगापूर ३१ केंद्र, ९८२० विद्यार्थी, कन्नड २२ केंद्र ५७१३ विद्यार्थी, खुलताबाद ११ केंद्र, २६३४ विद्यार्थी, पैठण-२१ केंद्र, ५९६० विद्यार्थी, सिल्लोड-२५ केंद्र ६६०७ विद्यार्थी, सोयगाव-६ केंद्र, १५०१ विद्यार्थी, वैजापूर १७ केंद्र, ४८१९ विद्यार्थी फुलंब्री १३ केंद्र ३४८९ विद्यार्थी.इयत्ता १२ वी- छत्रपती संभाजीनगर ग्रामिण- २० केंद्र ८०८६ विद्यार्थी, छत्रपती संभाजीनगर शहर-३३ केंद्र १४ हजार २५५ विद्यार्थी, गंगापूर १४ केंद्र, ६४०० विद्यार्थी, कन्नड १९ केंद्र ६०१२ विद्यार्थी, खुलताबाद १२ केंद्र, ४६२५ विद्यार्थी, पैठण-१६ केंद्र, ५८०२ विद्यार्थी, सिल्लोड-१७ केंद्र ६०५३ विद्यार्थी, सोयगाव-८ केंद्र, ३११४ विद्यार्थी, वैजापूर ११ केंद्र, ५३०१ विद्यार्थी फुलंब्री ११ केंद्र ४३३० विद्यार्थी.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी, शिक्षण विभागासह सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून काम करावे. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे काम करणाऱ्या शिक्षक, शिक्षण संस्था व केंद्र यांचा सन्मान केला जाणार असून कॉपी करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आज परीक्षेतील गैर प्रकार टाळण्यासाठी दक्षता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) अश्विनी लाटकर, शिक्षण मंडळ सहसचिव सचिव प्रियाराणी पाटील, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षण अधिकारी(योजना) अरुणा भूमकर यांच्यासह सर्व गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात १० वी आणि १२ वीच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर परीक्षेतील गैर प्रकार टाळण्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त वाढवण्याचे नियोजन करण्यात आले आहे,अशी माहिती श्रीमती लाटकर यांनी दिली.

शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातील कोणत्याही परीक्षा केंद्रावर कॉपी होणार नाही याची खबरदारी परीक्षा केंद्र, संस्था चालक, नियुक्त कर्मचारी,अधिकारी, पोलीस यंत्रणा यांनी घ्यावी, असे लेखी आदेश देण्यात येतील. कॉपी होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून केंद्राच्या जवळ असणाऱ्या झेरॉक्स मशीन बंद करण्यात येतील. परीक्षाकेंद्राबाहेर पालकांची होणारी विनाकारण गर्दी, विविध पुस्तकांची विक्री थांबवण्यात यावी, याबाबतचे सर्वेक्षण संबंधित तालुकास्तरावर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी करावे.

परीक्षा केंद्राबाहेर प्रतिबंधात्मक लागू करण्याविषयीचे आदेश निर्गमित करण्यात यावे. परीक्षा केंद्रावर भरारी पथक, बैठे पथक, केंद्रामधील बदल व स्थानिक वातावरण यानुसार नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी शिक्षण विभागांना दिल्या. कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी लोकांमध्ये जाणीव जागृतीसाठी समुपदेशन, कार्यशाळा,विविध कार्यक्रम, प्रसारमाध्यमातून आवाहन करावे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कॉपीमुक्त आणि तणावरहीत परीक्षा पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.